**प्रेसनोट दि. २७.१२.२०२३**

लोकसेवक श्री. पुंडलिक हिरामण चव्हाण, वय ४९ वर्ष, व्यवसाय- नोकरी, मिळकत व्यवस्थापक, कर व प्रशासकीय सेवा, वर्ग-३, विटा नगरपरिषद विटा, यांना २५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वडील नगरपरिषद विटा येथे कार्यरत होते व ते सुमारे २ महिन्यापुर्वी मयत झालेले असून त्यांचे सेवा कालावधीतील मिळणाऱ्या शासकीय देय रक्कमेचा चेक काढणेसाठी लोकसेवक श्री.पुंडलिक हिरामण चव्हाण, वय ४९ वर्ष, व्यवसाय- नोकरी, मिळकत व्यवस्थापक, कर व प्रशासकीय सेवा, वर्ग-३, विटा नगरपरिषद विटा, यांनी तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२०.१२.२०२३ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.२०.१२.२०२३, दि. २१.१२.२०२३ व दि. २६.१२.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री. पुंडलिक हिरामण चव्हाण, वय ४९ वर्ष, व्यवसाय- नोकरी, मिळकत व्यवस्थापक, कर व प्रशासकीय सेवा, वर्ग-३, विटा नगरपरिषद विटा, यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे सेवा कालावधीतील मिळणाऱ्या शासकीय देय रक्कमेचा चेक काढणेसाठी २५,०००/- रूपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि. २७.१२.२०२३ रोजी विटा हायस्कुल विटा येथे सापळा लावला लोकसेवक श्री.पुंडलिक हिरामण चव्हाण, वय ४९ वर्ष, व्यवसाय- नोकरी, मिळकत व्यवस्थापक, कर व प्रशासकीय सेवा, वर्ग-३, विटा नगरपरिषद विटा यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून २५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. पुंडलिक हिरामण चव्हाण, वय ४९ वर्ष, व्यवसाय- नोकरी, मिळकत व्यवस्थापक, कर व प्रशासकीय सेवा, वर्ग-३, विटा नगरपरिषद विटा, रा. मंजुनाथ निवास, साळशिंगी नाका, साळशिंगी रोड विटा ता.खानापूर, जि.सांगली. मुळ रा. मोहनदरे, ता.कळवण, जि.नाशिक यांचेविरुध्द विटा पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार ऋषीकेश बडणीकर, सलिम मकानदार, अजित पाटील, रामहरी वाघमोडे, धनंजय खाडे, सुदर्शन पाटील, सिमा माने, उमेश जाधव, चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
सत्यमेव जयते

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली

Scanned with OKEN Scanner